14 MAY 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील व्यवस्थापन विकास कार्यक्रमास प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट विभागामार्फत 'भविष्यकाळातील काम, कामाचे ठिकाण आणि मानवी संसाधने' या मुख्य विषयावर एकदिवसीय व्यवस्थापन विकास कार्यक्रम झाला.

प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. भारत फोर्जचे संचालक मानव संसाधन डॉ. संतोष भावे, कॅडमॅक्स एज्युकेशन ट्रस्टचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक अरुणकुमार पाटील, कोल्हापूर औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागाचे उपसंचालक अभिजित अवसरे उपस्थित होते.

पहिल्या सत्रात प्रसिद्ध विधिज्ञ आदित्य जोशी, विधिज्ञ पार्थ पती, दीपक जोशी यांनी कामगार आणि उद्योगामधील नवीन कायद्यातील ट्रेंडचा अवलंब करून काम, कार्यस्थळ आणि मानवी संसाधनांवर प्रभाव या विषयावर मार्गदर्शन केले. कल्याणी ग्रुपचे मानव संसाधन अरुण फुलेरा, विलो माथेर व प्लॅट पंप्सचे मानव संसाधन नितीन असलकर, बीएनवाय मेलोनचे उपाध्यक्ष मानव संसाधन बळीराम मुतेकर, भारत फोर्जचे मानव संसाधन व्यवसाय भागीदार श्रेयश किरपेकर यांनी कामाच्या वातावरणावर नवीन तंत्रज्ञानाचा प्रभाव या विषयावर मार्गदर्शन केले. चर्चा समन्वयिका म्हणून ज्ञानसागर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, पुणे येथील सहयोगी प्रा. डॉ. रचना शिखरे यांनी काम पाहिले.

दुसऱ्या सत्रात अनिश्चिततेचे मार्गनिर्देश बदल अनुकूल करणे आणि गतिमान कार्य वातावरणात कर्मचाऱ्यांमध्ये लवचिकता वाढवणे या विषयावर केएसबी इंडियाचे उपाध्यक्ष मानव संसाधन मोहन पाटील, भारत फोर्जचे संचालक मानव संसाधन डॉ. संतोष भावे यांनी मार्गदर्शन केले. उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील दरी कमी करणारे सहकार्य वाढवणे या विषयावरील चर्चेत प्रा. डॉ. एस. एस. महाजन यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डीकेटीई सोसायटीच्या वस्त्रोद्योग आणि अभियांत्रिकी संस्थेच्या सचिव डॉ. सपना आवाडे, वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे प्र-संचालक डॉ. नितीन माळी, कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. अमोल मिणचेकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAY 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे १६ पासून प्रवेश परीक्षा

## वेळापत्रक जाहीर; २६ अभ्यासक्रमांचा समावेश



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेश परीक्षांचे (एंट्रन्स एक्झाम) आयोजन करण्यात आले आहे. १६ मेपासून प्रवेश परीक्षांना सुरुवात होणार असून यात २६ अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

विद्यापीठाने प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार दि. १६ रोजी सकाळी १० ते ५ यावेळेत एम.एस्सी. (बॉटनी), एम.एस्सी. (स्टॅटस्टिक, अप्लाईड स्टॅटस्टिक अँड इन्फॉर्मेटिक्स), बी.लिब., एमएस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स), मास्टर ऑफ सोशल वर्क, एम.एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी, बायोकेमेस्ट्री, मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा होतील. दि. १७ रोजी मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, एम.ए. (मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम), एम.एस्सी. (नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी), एम.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स), एम.एस्सी. (ॲग्रोकेमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट), बॅचलर ऑफ जर्नालिझम, मास्टर ऑफ जर्नालिझम, एम.एस्सी. (फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी) परीक्षा होणार आहेत.

दि. १८ रोजी एम.एस्सी केमेस्ट्री (इंडस्ट्रियल, ॲप्लाईड, ऑर्गेनिक, इनऑर्गेनिक, फिजिकल, ॲनालिटीकल), एम.एस्सी (मॅथ्स), एम.एस्सी (मॅथ्स वुईथ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन), एम.एस्सी. (मायक्रोबायॉलॉजी, फार्मास्युटिकल, इंडस्ट्रियल व ॲप्लाईड मायक्रोबायॉलॉजी), एम.एस्सी. (झूलॉजी), एम.एस्सी. (फिजिक्स) आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा होतील. दि. १९ रोजी एम.एस्सी. (इन्व्हायर्मेंटल सायन्स), मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी (रूरल टेक्नॉलॉजी), एम.ए./एम.एस्सी. (जॉग्रॉफी), एम.एस्सी. (जिओ इन्फॉर्मेटिक्स), एम.ए. (योगाशास्त्र), एमबीए (रूरल मॅनेजमेंट), एमबीएस (डिस्टन्स मोड) अभ्यासक्रमांच्या परीक्षा होतील. परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांनी परीक्षा द्यावी, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAY 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

▪ १६ ते १९ या कालावधीत होणार पदव्युत्तर प्रवेश परीक्षा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मधील प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर झाले आहे. सर्व विषयांच्या परीक्षा १६ ते १९ मे दरम्यान होणार आहेत, तरी विद्यार्थ्यांनी याची नोंद घेऊन परीक्षेला वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत एमएस्सी. बॉटनी, एमएस्सी स्टॅटेस्टिक्स, अप्लाईड स्टॅटेस्टिक्स अॅन्ड इन्फर्मेशन, बी. लिप., एमएस्सी इलेक्ट्रॉनिक्स, मास्टर ऑफ सोशल वर्क, एमएस्सी बायोटेक्नॉलॉजी, बायोकेमेस्ट्री, मेडिकल इन्फर्मेशन मॅनेजमेंट या विषयांची प्रवेश परीक्षा १६ मे रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत तीन सत्रात होणार आहे.

मास्टर ऑफ कॉम्प्युटर अॅप्लिकेशन, एम. ए. मास कम्युनिकेशन अॅन्ड जर्नालिझम, एमएस्सी नॅनोसायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी, एमएस्सी कॉम्प्युटर सायन्स, एमएस्सी अॅग्रो केमिकल अॅन्ड पेस्ट मॅनेजमेंट, बॅचलर ऑफ जर्नालिझम, मास्टर ऑफ जर्नालिझम, एमएस्सी फूड सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी या विषयांची प्रवेश परीक्षा १७ मे रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत तीन सत्रात होणार आहे.

एमएस्सी केमेस्ट्री इंडस्ट्री, अप्लायड, ऑरगॅनिक, फिजिकल अॅनॅलिटीकल, एमएस्सी मॅथेमॅटिक्स, एमएस्सी मॅथेमॅटिक्स वुईथ कॉम्प्युटर अॅप्लिकेशन, एमएस्सी मायक्रोबायोलॉजी, फार्मासिटिकल, मायक्रो इन्डस्ट्री, एमएस्सी झुलॉजी, फिजिक्स या विषयांची प्रवेश परीक्षा १८ मे रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत तीन सत्रात होणार आहे.

एमएस्सी एनव्हायर्मेंटल सायन्स, मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी, एम. ए., एमएस्सी जिऑग्राफी, एमएस्सी जिओइन्फर्मेटिक्स, एम. ए. योगाशास्त्र, एमबीए इन रूरल मॅनेजमेंट, एमबीए डिस्टन्स मोड या विषयांच्या परीक्षा १९ मे रोजी तीन सत्रात होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAY 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षा १६ मे पासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे शैक्षणिक वर्ष २०२४ - २०२५ साठीच्या प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा दि. १६ ते १९ मे या दरम्यान होणार आहे. ही माहिती कुलसचीव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी पत्रकाव्दारे दिली आहे. दि. १६ रोजी एम.एस्सी. बॉटनी,



एम.एस्सी. स्टॅटीस्टीक, बी. लिब, एम.एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स, मास्टर ऑफ सोशल वर्क, एम.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी, दि. १७ रोजी एम.ए. मास कम्यूनिकेशन, एम.एस्सी. नॅनो सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी, एम.एस्सी. कॉम्प्यूटर सायन्स, एम.एस्सी. अ‍ॅग्रो केमिकल्स अ‍ॅण्ड पेस्ट मॅनेजमेंट, बॅचलर ऑफ जर्नालिझम, मास्टर ऑफ जर्नालिझम, एम.एस्सी. फूड सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी, दि. १८ मे रोजी एम.एस्सी. केमिस्ट्री, एम.एस्सी. मॅथेमॅटीक्स, एम. एस्सी. मायक्रोबायोलॉजी, एम.एस्सी. झूलॉजी, एम.एस्सी. फिजीक्स, तर दि. १९ रोजी एम.एस्सी. इनव्हॅर्मेंटेल सायन्स, मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी, एम.एस्सी. भूगोल, एम.एस्सी. जिओइन्फॉरमेटीक्स, एम.ए. योगशास्त्र, एम.बी.ए. इन रूरल मॅनेजमेंट, एम.बी.ए. डिस्टंस मोड या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAY 2024
सकाळ

# शिवाजी विद्यापीठाच्या गुरुवारपासून प्रवेश परीक्षा

कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठाच्या विविध २६ अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा गुरुवार (ता. १६) ते रविवार (ता. १९) दरम्यान कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील केंद्रांवर होणार आहे.

एम. एस्सी. बॉटनी, इलेक्ट्रॉनिक्स, बायोटेक्नॉलॉजी, मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनिजमेंट स्टॅटीस्टिक, बी. लिब, मास्टर ऑफ सोशल वर्क, एमसीए., एम. ए. मास कम्युनिकेशन, एम. एस्सी. नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी, कॉम्प्युटर सायन्स, ॲग्रो केमिकल अँड पेस्ट मॅनिजमेंट, बीजेसी., एमजेसी., एम. एस्सी. फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, केमिस्ट्री, झूलॉजी, फिजिक्स, एम. बी.ए., अशा विविध २६ अभ्यासक्रमांची परीक्षा घेतली जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAY 2024
सकाळ

# 'आयडिया' हे भविष्यकाळातील अर्थव्यवस्थेचे बलस्थान: डॉ. सादळे

कोल्हापूर, ता. १३ : 'आयडिया' हे भविष्यकाळातील अर्थव्यवस्थेचे बलस्थान असेल, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या आयपीआर सेलचे संचालक डॉ. एस. बी. सादळे यांनी व्यक्त केले. शहाजी लॉ कॉलेजमध्ये बौद्धिक संपदा हक्क, या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. यावेळी ते बोलत होते. प्रा. डॉ. सविता रासम प्रमुख उपस्थित होत्या.

डॉ. सादळे म्हणाले, 'बौद्धिक संपदा हक्काच्या अनुषंगाने असलेले विविध कायदे लक्षात घेता यामध्ये करिअरच्या संधींचा अवकाश मोठा आहे. तो लक्षात घेतल्यास कायद्याच्या विद्यार्थ्यांना यामध्ये सर्वोत्तम करिअर करता येईल. क्षेत्र कोणतेही असो त्यामध्ये संशोधन, नवनिर्मितीला महत्त्व असतेच आणि त्यात कॉपीराइट, ट्रेडमार्क, पेटंट, 'जीआय', इंडस्ट्रियल डिझाईनच्या संदर्भातून अनेक बाबी येतात, त्या बौद्धिक संपदा हक्काच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरतात. यापूर्वी एखादे क्षेत्र वा उत्पादन अर्थव्यवस्थेला गतिमान करण्यात हातभार लावत असे. मात्र, अभिनव संकल्पना हे उद्याच्या अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचा घटक ठरणार आहे. याबाबत जो देश काम करेल, त्याची अर्थव्यवस्था विस्तारेल.'

डॉ. रासम यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. प्रा. कल्याणी पवार यांनी परिचय करून दिला.



कोल्हापूर : शहाजी लॉ कॉलेजमध्ये बौद्धिक संपदा हक्क, या विषयावरील व्याख्यानात बोलताना डॉ. एस. बी. सादळे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAY 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या ३८० परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. २१ मार्चपासून सुरू आहेत. सोमवारी दिवसभरात २१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. आजअखेर ३८० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले. सोमवारी एकूण १४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा विविध महाविद्यालयांमध्ये झाल्या. या परीक्षांसाठी ४९७७ पैकी ३६२ विद्यार्थी अनुपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAY 2024
लोकमत

# ३८० अभ्यासक्रमांचे निकाल आजअखेर जाहीर

## विद्यापीठात वर्णनात्मक पद्धतीने परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विविध महाविद्यालयात मार्च आणि एप्रिल २०२४ या उन्हाळी सत्रातील १४ पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सोमवारी वर्णनात्मक पध्दतीने परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी ४,९७७ विद्यार्थ्यांपैकी ३६२ विद्यार्थी अनुपस्थित होते. दरम्यान, सोमवारी विविध २१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले असून, आजअखेर ३८० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

उन्हाळी सत्रात सोमवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, बॅचलर ऑफ आर्किटेक्चर, मास्टर ऑफ लॉज, मास्टर ऑफ सायन्स, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, एमएस्सी इंडस्ट्रीयल मॅथेमॅटिक्स मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ आर्टस, मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ सायन्स टेक्नॉलॉजी, बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग, एमएस्सी टेक्नॉलॉजी (इंडस्ट्रीयल मॅथेमॅटिक्स वुईथ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स) या परीक्षा पार पडल्या आहेत, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकांकडून देण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAY 2024
पुढारी

# विद्यापीठाच्या वतीने ३८० अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर ३८० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यापीठाच्या वतीने पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सध्या सुरू आहेत. सोमवारी १४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. परीक्षेला चार हजार ९७७ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ३६२ विद्यार्थी अनुपस्थित होते.

दि. १३ रोजी पीजी डिप्लोमा इन बँकिंग फायनान्स, सर्टिफिकेट कोर्स इन पाली लँग्वेज, पीजी डिप्लोमा इन इंटर रिलेशन सायन्स, एमए (संस्कृत), एम.टेक. (रुरल मॅनेजमेंट), एमए (होम सायन्स), एमए (इतिहास) आदी २१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAY 2024
तरुण भारत

# विद्यापीठ अंतर्गत ३८० अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल-२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. सोमवारपर्यंत ३८० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले.

सोमवारी झालेल्या १४ विषयांच्या परीक्षेला ४ हजार ९७७ पैकी ४ हजार ६१५ विद्यार्थी उपस्थित होते. तर ३६२ विद्यार्थी अनुपस्थित होते. भरारी पथकाकडून तिन्ही जिल्ह्यातून कॉपीच्या प्रकाराची एकही नोंद झालेली नाही. परीक्षा प्रमाद समितीच्या नियमानुसार परीक्षा होत आहेत. तरी विद्यार्थ्यांनी नियमांच्या अधीन राहून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

14 MAY 2024 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बी. ए. स्पोर्ट्समधून क्रीडा क्षेत्रात करिअरच्या संधी

## शिवाजी विद्यापीठात चार वर्षाचा अभ्यासक्रम: अत्याधुनिक प्रशिक्षणासह अनेक सुविधा मिळणार



**अहिल्या परकाळे**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी गतवर्षीपासून केली आहे. विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच बारावीनंतर बी. ए. स्पोर्ट्ससारखा महत्वाचा चार वर्षाचा अभ्यासक्रम सुरू केला आहे. या अभ्यासक्रमासाठी ६० प्रवेश क्षमता असून गतवर्षी ३४ विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षाला प्रवेश घेतला होता. या सर्व विद्यार्थ्यांनी द्वितीय वर्षात प्रवेश घेतला आहे. जीम, योगा शिक्षक, फिटनेस कन्सल्टंट, खेळाचे समालोचन (कॉमेंट्री) अशा क्रीडा क्षेत्रातील नोकरीच्या संधी प्राप्त होणार आहेत. प्रत्येक विषयाला ५० टक्के थेअरी आणि ५० टक्के प्रॅक्टिकल असल्याने प्रत्यक्ष ग्राऊंडवर खेळाचा सराव करता येणार. त्यामुळे यंदा बी. ए. स्पोर्ट्स अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढला आहे.

स्पोर्ट्समध्ये करिअर करण्यासाठी बीपीएडचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो. बी. ए. (पदवी) नंतर बीपीएडला प्रवेश मिळतो. पण यामध्ये आयुष्याची २० वर्षे जातात. परंतु आता यंदाच्या [illegible] या वर्षापासून विद्यापीठात स्पोर्ट्समध्ये शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध आहे. हा अभ्यासक्रम चार वर्षांचा असल्याने ८ सेमिस्टरमध्ये परीक्षा होणार आहे. प्रत्येक सेमिस्टरला २२ क्रेडीट आणि ५५० गुण आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी बारावीनंतर बी. ए. स्पोर्ट्सला प्रवेश घेतला तर चार वर्षात अनेक करिअरच्या संधी उपलब्ध होतील. विद्यापीठाने विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वसतिगृह बांधण्याचे काम सुरू केले आहे. गेल्या दोन महिन्यापूर्वी पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते बांधकामाचे उद्घाटनही करण्यात आले. यापुढे विद्यापीठाच्या खेळाडूंनी ऑलिंपिक स्पर्धेत सुवर्णपदके मिळवावीत, अशी अपेक्षा पालकमंत्र्यांनी व्यक्त केली होती.




दरम्यान, स्पोर्ट्स अभ्यासक्रमाविषयी विद्यापीठ प्रशासन सातत्याने जनजागृती करीत आहे. यंदा दुसरे वर्ष सुरू होणार असल्याने दोन वर्षाचा अभ्यासक्रम तयार आहे. तर पुढच्या वर्षी तिसऱ्या वर्षाचा अभ्यासक्रम तयार होणार आहे. यातून बीपीएड विभागाचा पाया पक्का केला जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना करिअरची नवी संधी मिळणार आहे.

### आपआपल्या आवडीच्या खेळात पारंगत होता येते

बी. ए. स्पोर्ट्सला प्रवेश घेतल्यानंतर आवडीच्या खेळाचा सराव करता येणार आहे. तसेच प्रवेश विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहात राहण्याची सोय केली जाणार आहे. याशिवाय विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या खेळाचे अत्याधुनिक पद्धतीने प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे खेळाडूंना आपआपल्या आवडीच्या खेळात पारंगत होण्यास मदत होईल. शिवाय विद्यापीठ परिसरात सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा उपलब्ध आहेत. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळात सहभागी होण्याची संधी मिळेल.

> शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर, सातारा, सांगली जिल्ह्यातील खेळाडूंनी बी. ए. स्पोर्ट्ससाठी प्रवेश घ्यावा. बारावीनंतरच्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात राहण्याची सुविधा आहे. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीही दिली जाणार. तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळाडूंना मोफत वसतिगृह उपलब्ध करून दिले जात आहे.
>
> — डॉ. शरद बनसोडे (शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक, शिवाजी विद्यापीठ)